क्र.का.३/आय-सरिता आज्ञावली/२०१२/३७४
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे.
दिनांक - ०४/१०/२०१२.

**विषय** :- अभ्यास गट नेमण्याबाबत.

**कार्यालयीन आदेश :**

ज्याअर्थी, राज्यात दस्त नोंदणीसाठी **आय-सरिता** आज्ञावलीचा वापर यशस्वीपणे सुरु होवून जवळपास दोन महिन्यांचा कालावधी झाला असून, १२० कार्यालयात ५०००० पेक्षा जास्त दस्तांची नोंदणी या प्रणालीद्वारे झाली आहे,

आणि ज्याअर्थी, सदर प्रणालीचा वापर करणा-या दुय्यम निबंधक यांचे अनुभवांचा अभ्यास करुन, तसेच नागरिकांच्या अपेक्षांचा विचार करुन, **आय-सरिता** प्रणाली अधिक गतिमान, सुरक्षित व कामकाजासाठी सुलभ बनविण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरु आहे,

त्याअर्थी, या दृष्टीकोनातून, विचार-परामर्श व अनुभवांची देवाण-घेवाण करुन शिफारशी करण्यासाठी पुढीलप्रमाणे अभ्यास गट गठित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचा-यांचे नांव | कार्यालयाचे नांव |
|---|---|---|
| १ | श्री.बी.एस.समुद्रे | सह दुय्यम निबंधक, मुंबई शहर क्र.३ |
| २ | श्री.एस.ए.साटम | सह दुय्यम निबंधक, अंधेरी क्र.२ |
| ३ | श्री.संजय देशमुख | सह दुय्यम निबंधक, कुर्ला क्र.२ |
| ४ | श्री.डी.जे.माईनकर | सह दुय्यम निबंधक, हवेली क्र.१३, पुणे |
| ५ | श्री.एन.बी.गिरी | सह दुय्यम निबंधक, हवेली क्र.४, पुणे |
| ६ | श्री.पी.यु.खटावकर | सह दुय्यम निबंधक, अहमदनगर क्र.१ |
| ७ | श्री.गुंजाळ | सह दुय्यम निबंधक, सातारा क्र.२ |
| ८ | श्रीमती परब | सह दुय्यम निबंधक, कल्याण क्र.४ |
| ९ | श्री.वैद्य | सह दुय्यम निबंधक, पनवेल क्र.४ |
| १० | श्री.एस.ए.हिंगाणे | समन्वयक, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे. |

सदर अभ्यास गटाने आपल्या कार्यक्षेत्रातील इतर दुय्यम निबंधक यांचेशीही आवश्यक ती चर्चा करुन, प्रणालीविषयी बाबनिहाय अभिप्राय/सूचना/शिफारशी अभ्यास गटाच्या बैठकीत सादर कराव्यात.

उपरोक्त, सदस्यांशिवाय इतर कोणत्याही सह जिल्हा निबंधक/दुय्यम निबंधक/लिपिक कर्मचा-यास या कामात सहभागी व्हावयाचे असेल तर त्यांनी समन्वयक यांचेशी संपर्क साधून अभ्यास गटामध्ये सहभागी व्हावे. तसेच काही सूचना/अभिप्राय/शिफारशी असल्यास, feedback.isarita@gmail.com या e-mail ID वर पाठवाव्यात.

सदर अभ्यास गटाची पहिली बैठक रविवार दि.०७/१०/२०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता नोंदणी महानिरीक्षक कार्यालयातील सभागृहामध्ये आयोजित करण्यात आली आहे. तरी सदस्यांनी वेळेवर उपस्थित रहावे.

अभ्यास गटाने आपल्या शिफारशींचा एकत्रित प्रस्ताव व सादरीकरण मा.नोंदणी महानिरीक्षक यांचेकडे लवकरात लवकर सादर करण्याची दक्षता घ्यावी.

मा.नों.म.नि. यांचे
निर्देशान्वये.

नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,
(संगणक), पुणे.

प्रति :- १) वरील सर्व अधिकारी/कर्मचारी.

प्रत :- सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक.
२/- सदर आदेश आपल्या अधिनस्त सर्व अधिकारी/दुय्यम निबंधक/लिपिक यांचे निदर्शनास आणून द्यावेत.